RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ६, अंक ६०] शुक्रवार, ऑक्टोबर १६, २०२०/आश्विन २४, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ ऑक्टोबर २०२०.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मत्स्यआ-२०१९/प्र.क्र. ६०/पदुम-१२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधीत अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील मत्स्यव्यवसाय आयुक्तालयातील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवेतील प्रादेशिक उप आयुक्त मत्स्यव्यवसाय आणि उप आयुक्त (अर्थ व नियोजन), गट-अ (तांत्रिक) (राजपत्रित), पदाच्या सेवाभरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत:—

१. या नियमांना महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवेतील प्रादेशिक उप आयुक्त मत्स्यव्यवसाय आणि उप आयुक्त (अर्थ व नियोजन), गट-अ (तांत्रिक) (राजपत्रित), (सेवाप्रवेश) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "आयोग" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ख) "आयुक्तालय" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय ;

(ग) "विभाग" याचा अर्थ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग ;

(घ) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन.



Scanned by CamScanner

३. प्रादेशिक उप आयुक्त मत्स्यव्यवसाय आणि उप आयुक्त (अर्थ व नियोजन) (तांत्रिक) (राजपत्रित), गट-अ या पदावरील नियुक्ती सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) (राजपत्रित), गट-अ हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेने काटेकोर निवडीच्या आधारे पदोन्नतीने करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त उमेदवाराने यासंबंधी तयार केलेल्या नियमानुसार, मराठी व हिंदी भाषा परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केली नसल्यास वा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्याला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी संबंधीचे प्रमाणपत्र विहित मुदतीत धारण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**

शासनाचे प्रधान सचिव.

Scanned by CamScanner